Vol 4 Issue 8 Feb 2015 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-8 | Feb-2015
Available online at www.aygrt.isrj.org

# हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि स्टेट कॉंग्रेस

*राजेंद्र धाये*

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभागप्रमुख, संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी जि. जालना.

***सांराश :*** औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्यात सत्तेसाठी संघर्ष सुरु होतो. या अंतर्गत कलहाचा व कमकुवतपणाचा फायदा त्यांचाच दख्खनमधील एक सुभेदार निजाममुल्क घेतो आणि दगलबाजीने इ.स. 1724 मध्ये स्वतःचे स्वतंत्र राज्य घोषीत करतो. हैद्राबादला राजधानीचा दर्जा देतो, हाच भुभाग नंतर निजामाचे 'हैद्राबादचे संस्थान' म्हणून ओळखला जातो. पूढे याच निजामाच्या आसफिया (आसफजाही) या घराण्याची हैद्राबाद संस्थानावर 225 वर्षे अनिर्बंध सत्ता होती.

### *प्रस्तावना :*

हैद्राबाद हे संस्थान (राज्य) आणि त्यावर असलेली आसफिया घराण्याची सत्ता यांचा जन्म मुलुखगिरी, साहस, पराक्रम अथवा युध्द कौशल्य यातून झालेला नव्हता; तर निजामाचे हैद्राबाद हे दगलबाजी व संधिसाधूपणा यांचे औरस अपत्य होते. सातव्या निजामाच्या काळात हैद्राबादमध्ये हिंदूस्थानच्या (भारताच्या) दक्षिणेस एक समर्थ इस्लामी राज्य, एक अस्सल 'पाकिस्तान' आणि मुस्लीम संस्कृतीचे आदर्श केंद्र कायम करण्याची महत्वाकांक्षा उस्मानअली व त्याचे अन्य समर्थक बाळगून होते. त्याचा प्रारंभ मोगलांच्या मुस्लिम सत्तेला फसवून व तिच्याशी दगलबाजी करुन झाला होता. एवढेच नव्हे तर पुढे याच घराण्यातील निजामांनी दक्षिणेत इंग्रज आणि फ्रेंच यांच्याशी अखेरपर्यन्त दोन हात करणाऱ्या टिपू सुलतानाला धोका दिला व इंग्रजांना मदत करुन टिपूचा पराभव घडवून आणला.[1] हैद्राबाद संस्थानात बहुसंख्य लोकसंख्या हिंदू व इतर धर्मियांची असताना सत्ता मात्र मुठभर इस्लाम धर्मियांची होती. निजाम आणि आसफजाही घराण्याच्या बुरसटलेल्या सरंजामदारी व हुकूमशाही प्रवृत्तीला साजेल असेच हैद्राबाद संस्थानच्या राजवटीचे स्वरुप होते. या राजवटीच्या अखेरच्या पर्वात तर मुस्लीमेत्तर जनतेवर अत्याचारांचा कहरच झाला होता. त्यामुळेच इतिहासाने या वंशाची सत्ता संपुष्टात आल्याबद्दल दोन अश्रु ढाळावेत अथवा काळाच्या पटलावरुन ही सत्ता अंतर्धान पावल्याबद्दल विषाद वाटावा असे अजिबात घडले नाही. उलट लोकांना ही सत्ता गेल्याबद्दल आनंदच वाटला.

निजामाच्या या अन्यायी राजवटीला प्रतिकार करण्याचा, विरोधात आवाज उठवण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. संघटीत झाल्याशिवाय या प्रतिकाराला, विरोधाला काहीच अर्थ नाही हे लक्षात आल्यानंतर अनेक संघटना उदयास आल्या. संघटीत प्रतिकाराला सुरुवात झाली. यापैकीच एक म्हणजे हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस. या मुक्तीसंग्रामाच्या लढ्यात हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे कार्य उल्लेखनीय आहे.

### *हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस :*

हैद्राबाद संस्थानात निजामाच्या अन्यायी राजवटीला संघटनेशिवाय विरोध करणे अशक्य आहे हे लक्षात आल्यानंतर कार्यकर्ते एकत्र आले. त्यानंतर संस्थानात अनेक संघटना उदयास आल्या. त्यापैकीच एक संघटना म्हणजे हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस.

महाराष्ट्र परिषदेच्या पुढाकाराने इ.स. 1937 साली आन्ध्र महासभा, कर्नाटक परिषद व महाराष्ट्र परिषदेच्या प्रतिनिधींना निजामाच्या विरोधात लढण्यासाठी एकच राजकीय संस्था असावी असे वाटू लागले. यादृष्टीने त्यांच्या हालचाली सुरु झाल्या. याच सुमारास हैद्राबादेतील काही नेत्यांनी स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेसाठी एक अनौपचारिक बैठक बोलावली. अशा बैठका यापूर्वीही झाल्या होत्या; परंतु या बैठकांतून स्वामीजींना व आंध्र मराठवाड्यातील जहालांना वगळण्यात आले होते.

29 जून 1938 रोजी हैद्राबादमध्ये झालेल्या एका बैठकीत 'हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसची' स्थापना करण्यात आली. या बैठकीला स्वामी रामानंद तीर्थ हजर नव्हते. त्यासाठी एक अस्थायी समिती निवडण्यात येऊन तिचे संयोजकत्व रामकिशन धुत यांच्याकडे देण्यात आले. या हंगामी समितीचे सभासद म्हणून बी. रामकृष्णराव, सय्यद सिराजुल हसन तिरमिजी, माडपाटी हनुमंतराव, पांडुरंगराव जोशी आणि जी. रामाचारी यांची निवड करण्यात आली होती. या समितीने नंतर श्रीधर वामन नाईक, हरिलाल वाघरे, रविनारायन रेड्डी, गोविंदराव नानल, हरिश्चंद्र हेडा व जनार्दनराव देसाई यांना संलग्न करुन घेतले. अस्थायी

समितीने अवघ्या महिन्याभराच्या आत हैद्राबाद, सिकंदराबाद या दोन शहरांत व तिन्ही विभागांतील जिल्ह्यात स्टेट कॉंग्रेसचे 1200 प्राथमिक सभासद नोंदविले. त्यानंतर अस्थायी समितीच्या बैठकीत असे ठरविण्यात आले की, 09 सप्टेंबर 1938 ला सभासदांची आमसभा घ्यावी व कार्यकारी मंडळाची रीतसर निवडणूक करुन घ्यावी.2 मात्र तत्पूर्वीच दि. 08 सप्टेंबर 1938 रोजी निजामाने षब्लिक सेप्टी रेग्यूलेशनष या कायद्यान्वये 'हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवर' जन्माला येण्यापूर्वीच बंदी घातली.

निजाम सरकारच्या हुकूमान्वये स्टेट कॉंग्रेस अस्तित्वात येण्यापूर्वीच तिच्यावर बंदी घालण्यात आली. 'जातीयवादी' नसलेली व 'बाहेरच्या' लोकांशी संलग्न नसलेली राजकीय संघटना स्थापन करण्याच्या मार्गात सरकार आड येणार नाही; असे आश्वासन देऊन नुकतीच जन्माला येणारी संघटना राजकीय न राहाता ती जातीयच राहील असा निर्वाळा सरकारने दिला. अशी संस्था स्थापन झाली तर ती बेकायदेशीरच ठरेल असे सरकारने (निजाम) जाहीरही करुन टाकले,3 स्टेट कॉंग्रेसवर बंदी घालण्यापूर्वीच 07 ऑगस्ट 1938 रोजी तिने आपली ध्येय आणि उद्दिष्टे जाहीर केली होती. स्टेट कॉंग्रेसचे ध्येय, उद्दिष्टे आणि धोरण या संबंधात एक पत्रक काढून नागरीकांना या संघटनेचे सभासद होण्यासाठी आवाहन केले होते. या पत्रकामध्ये पुढील उद्दिष्टांवर भर देण्यात आला होता,

1.निजामाच्या छत्राखाली जबाबदार राज्यपध्दतीची स्थापना.
2.भिन्न जाती–जमाती दरम्यान परस्पर ऐक्य, सहकार्य निर्माण करणे.
3.राष्ट्रीय शक्तीची संघटना, चळवळ वाढविणे.
4.ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शांततामय व सनदशिर मार्गाचा अवलंब करणे.

जाती–जमातीत वैर न करता राष्ट्रीय भावना बळकट करण्यासाठी नागरिकांनी स्टेट कॉंग्रेसचे सभासद व्हावे अशी विनंती पत्रकाच्या शेवटी करण्यात आली.[4] उपरोक्त ध्येय आणि उद्दिष्टे समोर ठेवून स्थापन झालेल्या 'स्टेट कॉंग्रेसवर' बंदी घालताना निजामाचे पंतप्रधान सर अकबर हैदरी यांनी असे स्पष्टीकरण दिले की,

1.जबाबदार राज्यपध्दतीचे उद्दिष्टये समोर ठेवून केलेली कोणतीही चळवळ सरकार कधीही सहन करणार नाही.[5]
2.स्टेट कॉंग्रेसच्या नावाला सरकारचा विरोध आहे. अस्थायी समितीने 'स्टेट कॉंग्रेस' हे नाव बदलावे.
3.स्टेट कॉंग्रेस ही संघटना जातीय स्वरुपाची आहे.[6]

हैद्राबाद संस्थानात लोकशाही शासनप्रणाली स्थापीत करण्याची प्रेरणा म. गांधी, पंडीत नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल या नेत्यांकडून मिळाली. परंतु स्थापनेपूर्वीच हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवर कायद्याने बंदी घातली गेली. कॉंग्रेस ही भारतव्यापी संघटना बनली असल्यामूळे निजाम मिर अलिखॉं बहादूर यांना कॉंग्रेस या नावाबद्दल भीती होती. 'कॉंग्रेस या नावामुळे माझ्या राज्यातील बंडखोर नेते माझ्या प्रजेस गैरमार्गाने घेऊन जात आहेत तसेच कॉंग्रेस संघटनेत एक जातीयवादी गट देखील आहे.'[7] असा निजामाचा दावा होता. म्हणून स्टेट कॉंग्रेसची स्थापना होण्यापूर्वीच तिच्यावर बंदी आणली.

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविण्याचे प्रयत्न चालूच होते. पण त्याचा काही उपयोग होत नव्हता. स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिंदू, आनंदराव वाघमारे व परभणीच्या काही मंडळीसह नानलांना भेटले व त्यांनी स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारावे अशी त्यांना विनंती केली. हे अध्यक्षपद निरुपाधिक आणि साधे नव्हते तर सरकाने ज्या संघटनेवर बंदी टाकली तिचे अध्यक्ष बनणे म्हणजे सरकारविरोधी लढ्याचे नेतृत्व स्विकारने असा त्या अध्यक्षपदाचा अर्थ होता.[8] गोविंदराव नानल यांनी स्वामीजींची स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्षपद स्विकारण्याची विनंती मान्य केली.

***1938 चा सत्याग्रह :***

गोविंदराव नानल यांची स्टेट कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी नियुक्ती करुन त्यांच्या अध्यक्षतेखाली कृतिसमिती स्थापण करण्यात आली. या कृतिसमितीमध्ये रामकिशन धुत, जनार्दन देसाई, रविनारायण रेड्डी आणि श्रीनिवास बोरीकर यांचा समावेश होता. निजामाच्या विरोधात स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले. स्वामी रामानंद तीर्थांनी सत्याग्रहाची जबाबदारी स्विकारली होती. नानलांच्या अध्यक्षतेखालील कृतिसमितीने 1938 मध्ये सत्याग्रह सुरु केला. त्यांनी निजाम सरकारला पुढील मागण्या मान्य करण्याचे निवेदन दिले,

1.निजाम सरकारने हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेवर घातलेली बंदी उठवावी.
2.जबाबदार राज्यपध्दती अंमलात आणावी.
3.जनतेला राजकीय स्वातंत्र्य देण्यात यावे.[9]

24 आक्टोबर 1938 रोजी नानल यांनी त्यांच्या सहकार्यांसह हैद्राबादमध्ये सत्याग्रह केला आणि अशा रितीने हैद्राबाद संस्थानातील पहिल्या अहिंसक प्रतिकाराचा व संघर्षाचा प्रारंभ झाला. नानलांच्या पाठोपाठ स्वामी रामानंद तीर्थ यांना सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीचे सर्वाधिकारी नियुक्त करण्यात आले. त्यांच्या तुकडीत त्यांच्याखेरीज व्यंकटेश बापूजी उर्फ कॅप्टन जोशी (उस्मानाबाद), राघवेंद्रराव दिवाण (लातूर), राज रेड्डी (तेलंगण) आणि अप्पाराव (कर्नाटक) यांचा समावेश होता. नानलांच्या नंतर

तीन दिवसांनी म्हणजे 27 ऑक्टोबर 1938 रोजी स्वामीजींनी सत्याग्रह केला. सत्याग्रहापूर्वीच स्वामीजींनी हैद्राबाद शहराचे पोलिस कमिश्नर नबाब रहमत यार जंग बहादूर यांना रीतसर पत्र पाठवून, आपण बंदी मोडून स्टेट काँग्रेसचे कार्य करणार असल्याचे कळविले होते. त्या सर्वांना पोलिसांनी अटक केली.[10] निजामाच्या अन्यायी राजवटीविरुध्दचा हा पहिलाच सत्याग्रह होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही या सत्याग्रहाचे समर्थन केले होते.

हैद्राबाद संस्थानात सत्याग्रहाचे वारे जोमात वाहू लागले होते. निजाम सरकारने सत्याग्रहींचे अटक सत्र सुरु केले होते. स्वामी रामानंद तीर्थांनी यावेळी एक जाहीर निवेदन प्रकाशीत करुन हैद्राबादच्या जनतेला व विशेषतः युवकांना स्वातंत्र्याच्या वेदीवर बलीदान करण्यासाठी तयार राहण्याचे आवाहन केले. त्यांनी सत्याग्रह आणि त्याच्या तळाशी असणारे अहिंसा–तत्व यांची कोणती पथ्ये सत्याग्रहींनी व जनतेने पाळावीत याचेही सविस्तर विवेचन केले. ही मशाल आता सर्वजण पेटती ठेवतील आणि पारतंत्र्याचा अहंकार लोप पावून लवकरच सर्वत्र स्वातंत्र्याचा प्रकाश पसरेल अशी त्यांनी आशा व्यक्त केली. आपल्या या निवेदनात स्वामीजींनी म्हटले की, "सरकारच्या धमक्यांना आम्ही मुळीच भीक घालीत नाही. या सरकारने जनतेचे नैतिक पाठबळ गमावले आहे. एक ना एक दिवस जनतेच्या इच्छेला या सरकारला शरण जावेच लागेल. अनेक तरुण मोठ्या संख्येत सत्याग्रही म्हणून आपली नावे नोंदवीत आहेत. मला अशी खात्री आहे की, शेकडोंनी तरुण या संघर्षात उतरतील व तुरुंग तुडूंब भरुन काढतील."[11] सत्याग्रह सुरु झाल्यानंतर अवघ्या दोन महिन्यात शेकडो सत्याग्रहींनी सत्याग्रह केला. अनेकजण तुरुंगात गेले. हैद्राबादमध्ये एकूण 18 तुकड्यांनी सत्याग्रह केला, या सर्व तुकड्यांना तुरुंगात जावे लागले.

मराठवाड्यातील कार्यकर्त्यांच्या आग्रह व दबावामूळे औरंगाबादला सत्याग्रहाचे दुसरे केंद्र उघडण्यात आले. औरंगाबाद केंद्राच्या पहिल्या तुकडीचे नेतृत्व वकील माणिकचंद पहाडे यांनी केले. औरंगाबाद केंद्राची पहिली तुकडी माणिकचंद पहाडे यांच्या नेतृत्वाखाली 20 नोहेंबर 1938 रोजी सत्याग्रह करुन तुरुंगात गेली. मराठवाड्यात बीड, नादेंड, परभणी, उस्मानाबाद या ठिकाणीही सत्याग्रह झाले.[12] या सत्याग्रहात अनेकांना अटक झाली. मराठवाड्यातील तालुका केंद्रापर्यंत या सत्याग्रहाचे लोण पोहचले होते.

सत्याग्रहाच्या भुमिगत कामासंबंधी गंगापुरचे रामगोपाळ नावंदर, औरंगाबादचे रतिलाल जरीवाला व नागोराव विश्वनाथ पाठक यांना अटक झाली. नावंदर यांना पुराव्याअभावी सोडून देण्यात आले. कालांतराने इतर दोघांचीही सुटका झाली.[13] 1938 चा सत्याग्रह जेवढा लोकांना नवा आणि अपरिचित होता तेवढाच तो शासनाला व पोलीसांनाही. निजामी पोलिसांनी या सत्याग्रहाला दडपून टाकण्यासाठी जुलूमजबरदस्ती आणि अत्याचार यांची परिसीमा केली. जवळ जवळ सर्वच सत्याग्रहींना जबर मारहाण केली जात असे. माफीनामे लिहून देण्याची सक्ती होत असे. इतर हालअपेष्टांना पारावार नव्हता. बहुतेकांना हातकड्या घालून त्यांच्या गावी मुद्दाम मिरविले जात असे. या अत्याचारांमुळे सत्याग्रहावर परिणाम तर झाला नाहीच उलट लोक अधिक प्रतिकारक्षम बनले.

### *स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवली :*

1938 मध्ये घातलेली स्टेट काँग्रेसवरची बंदी सुमारे आठ वर्षानंतर म्हणजेच 3 जुलै 1946 रोजी निजाम सरकारने उठविली.

हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे पहिले अधिवेशन ठरल्याप्रमाणे 16, 17 आणि 18 जून 1947 रोजी झाले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष हैद्राबादचे रामचंद्रराव अंतू होते. अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ होते. हैद्राबाद संस्थान भारतात विलिन झाल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्याला पूर्णत्व येणार नाही, असे त्यांनी आपल्या भाषणात म्हटले. भारतीय स्वातंत्र्याची अखेरची लढाई हैद्राबाद संस्थानाच्या भूमीवर लढली जाणार असून या लढाईत जनतेचाच विजय हाईल, असा आशावाद त्यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केला.[14] या अधिवेशनाला लाखो लोक उपस्थित होते. हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलिन करायचे याच विचाराने सर्वजन झपाटलेले होते.

सोलापूरला 29, 30 जून आणि 1 जूलै 1947 ला स्वामीजींनी हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या कार्याकारीणीची बैठक बोलावली. मुद्दामच ही बैठक संस्थानाबाहेर बोलावली. कार्यकारीणीने लढ्याचा तपशील निश्चित करुन त्यादृष्टीने तेलंगणासाठी एम्. रामचंद्रराव, मराठवाड्यासाठी गोविंदभाई श्रॉफ, कर्नाटकसाठी मुरलीधरराव कामतीकर आणि हैद्राबाद–सिकंदराबादसाठी डॉ. मेलकोटे या चौघांची तेथील आंदोलन कार्याचे प्रभारी इनचार्ज म्हणून नेमणूक केली.[15]दिगंबरराव बिंदू यांच्या अध्यक्षतेखाली एक कृतिसमिती नेमण्यात आली. जुलै महिन्याच्या शेवटी हैद्राबादमध्ये कार्यकारीणीची बैठक झाली. तेथे हैदबादमधील जनतेच्या स्वातंत्र्याचा अखेरचा लढा पुकारण्यात आला. त्यानुसार, 07 ऑगस्ट 1948 हा दिन संघराज्यात सामील होण्याचा दिन म्हणून पाळावा, त्यासाठी सभा घ्याव्यात, प्रभातफेऱ्या काढव्यात, घरोघरी भारतीय संघराज्याचा तिरंगा ध्वज आपला ध्वज म्हणून लावावा. असहकाराचा कार्यक्रम म्हणून हैद्राबादची विधानसभा, नगरपरिषदा, ग्रामपंचायतीचे सभासदांनी राजीनामे द्यावेत. हैद्राबाद स्टेट बँक, सरकारच्या पोष्ट बचत बँका यामधील ठेवी काढून घ्याव्यात, धान्य वसुलीस विरोध करावा, आणि सर्व सरकारी कार्यक्रमांवर बहिष्कार टाकावा असा कार्यक्रम दिला गेला व सर्व कार्यक्रम संस्थानभर अंमलात आणले.[16]

1947 मध्ये स्टेट काँग्रेसने सुरु केलेला लढा पूढे वाढतच गेला. भारत सरकार आणि निजाम सरकार यांच्यामध्ये जूलै 1948 पर्यन्त वाटाघाटी चालूच होत्या. हैद्राबादच्या संदर्भात सरदार पटेलांचे धोरण कणखरच होते. निजामा बरोबरच्या वाटाघाटी फिसकटल्यानंतर शेवटी 13 सप्टेंबर 1948 हा दिवस हैद्राबाद संस्थानावर पोलीस कारवाईसाठी घोषीत करण्यात आला.

### *सारांश :*

अशाप्रकारे निजाम राजवटीने जनता व भारत सरकारला वेठीस धरुन एक प्रकारे आव्हानच केले होते. कारण हैद्राबाद

संस्थानचे मुस्लिम राष्ट्रात रुपांतर करणे हे निजामाचे स्वप्न होते. याच त्याच्या धर्मवेडातून हैद्राबादचा मुक्तीसंग्राम सुरु झाला असे म्हणावे लागेल. हैद्राबाद मुक्तीसंग्रामाची पार्श्वभुमी तपासली तर आपल्या असे लक्षात येईल की संस्थानात बहुसंख्येने जास्त असणाऱ्या हिंदूंवर अनेक कडक बंधने लादण्यात आली होती. संस्थानातील जनतेची मुस्कटदाबी सुरु होती. अत्याचारात वाढ झाली होती. निजामाच्या याच अत्याचारामूळे हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा लढा सुरु झाला. निजामाच्या अन्यायी राजवटीतून आपण मुक्त व्हावे हे संस्थानातील प्रत्येक माणसाला वाटू लागले.

निजामाच्या अन्यायी राजवटीच्या विरोधात अनेकांनी आवाज उठवण्याचा प्रयत्न केलेला आपणास दिसतो. त्यात धार्मिक व सामाजिक संघटना आहेत. व्यक्तीच्या संघटना आहेत. राजकीय संघटना आहेत. त्यातीलच एक हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस ही महत्वाची. स्टेट कॉंग्रेसच्या माध्यमातून हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा लढा व्यापक व तिव्र होत गेला आणि अखेर 13 सप्टेंबर 1948 हा दिवस पोलीस कारवाईचा दिवस घोषीत करण्यात येवून हैद्राबादाचे संस्थान भारतीय संघराज्यात सामील करण्याचा मार्ग मोकळा झाला.

### *संदर्भ*

1.भालेराव अनंत, हैद्राबादचा स्वातंत्र्य संगाम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन, खटाववाडी, मुंबई, सप्टेंबर 1987, पृ.क्र. 2.
2.कित्ता, पृ.क्र. 108.
3.कुलकर्णी श्रीधर रंगनाथ (संपा.) हैद्राबाद राज्याचे विसर्जन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1993, पृ.क्र. 78.
4.कित्ता, पृ. क्र. 77–78.
5.स्वामी रामानंद तीर्थ, (देउळगावकर वि.पा.–अनुवादक), हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी, पॉप्यूलर प्रकाशन मुंबई, पुनर्मुदण 2005, पृ. क्र. 83.
6.देउळगावकर वि.पा. (संपादन), स्वामी रामानंद तीर्थ यांची दैनंदिनी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 2001, पृ. क्र. 22.
7.पोतदार वसंत, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, विद्याभारती प्रकाशन, लातुर, तृतीय आवृत्ती 2006, पृ.क्र. 72.
8.भालेराव अनंत, उपरोक्त, पृ. क्र. 116.
9.काटे पी.व्ही., मराठवाडा अंडर दि निझाम, मित्तल पब्लिकेशन दिल्ली, 1987, पृ.क्र. 62.
10.भालेराव अनंत, उपरोक्त, पृ.क्र. 120–121.
11.कित्ता, पृ. क्र. 121.
12.कित्ता, पृ. क्र. 124–128.
13.कित्ता, पृ. क्र. 131.
14.चारठाणकर, चौधरी, मेढेकर आणि देशपांडे (संपादक), स्वातंत्र्य संग्राम : परभणी जिल्ह्याचे योगदान, प्रकाशन–परभणी जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती, साकार मुद्रणालय, जयहिंद कॉलनी, औरंगाबाद, 1996, पृ. क्र. 89–91.
15.भालेराव अनंत, उपरोक्त पृ.क्र. 306
16.कित्ता, पृ. क्र. 306–307.



***राजेंद्र धाये***
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभागप्रमुख, संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी जि. जालना.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org